# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय: बँकेच्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी महानगरपालिका कर्मचारी जे बँकेचे सभासद आहेत त्यांना कामकाजाच्या वेळेत सभेस उपस्थित राहण्यास सवलत मिळण्याबाबत.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, यांची त्र्याहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. २९ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न.चिं.केळकर पथ, दादर (प), मुंबई-४०००२८ येथे आयोजित करण्यात आली आहे.

महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांच्या दि. १७ सप्टेंबर, २०२५ च्या पत्राच्या अनुषंगाने जे महानगरपालिका कर्मचारी सदर बँकेचे सभासद आहेत अशा महानगरपालिका कर्मचा-यांना बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सोमवार, दि. २९ सप्टेंबर, २०२५ दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्यास मा. महानगरपालिका आयुक्त यांनी क्र.एमजीसी /एफ/७८४९ दि.२३.०९.२०२५ अन्वये मंजूरी दिली आहे.

तद्अनुषंगाने बँकेच्या सभासद असणा-या कर्मचा-यांनाच, सोमवार, दि. २९ सप्टेंबर, २०२५ रोजी श्री शिवाजी मंदिर, न.चिं.केळकर पथ, दादर (प), मुंबई-४०००२८ येथे होणा-या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात येत आहे.

सदर परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circular या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही/- २४.०९.२०२५
(श्रीम. शारदा शा. गोसावी)
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/- २४.०९.२०२५
(श्री. किशोर गांधी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्र.प्रकअ/१९७/सर्वसा(एमओपी/२६२)
दि. २४.०९.२०२५

प्रत------------------------------------------------------------ यांना (--------जादा प्रतींसह)
माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

(श्रीम. लिआना लॉ. कार्डोझ)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय